**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नियोजित इमारतीच्या फर्निचरच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मलोआ ११२६/प्र.क्र.३४/मलोआ**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०१ एप्रिल, २०२६.

**वाचा :-**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मलोआ १११९/ प्र.क्र. ८८/ आठ, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२,
२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांचे पत्र क्रमांक साबांवि/ पनवेल/ प्रशा-१/ ६९, दिनांक ६ जानेवारी, २०२६,
३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक सीबीडी ०११९/ सी.आर.०१/ २०२५/ चार, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या बेलापूर, सी.बी.डी. येथील नियोजित इमारतीच्या बांधकामासाठी वाचा क्रमांक १ येथील दिनांक ९ नाव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २८२,२५,००,०००/- (अक्षरी रुपये दोनशे ब्याऐंशी कोटी पंचवीस लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये फर्निचरच्या कामासाठी रुपये १०,०१,७५,२५०/- (अक्षरी रुपये दहा कोटी एक लक्ष पंचाहत्तर हजार दोनशे पन्नास फक्त) इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती.

तथापि, आयोगाच्या कार्यालयाची संवेदनशीलता, गोपनियता तसेच कामाचे विशिष्ट स्वरुप लक्षात घेऊन आयोगाच्या सध्याच्या व भविष्यातील गरजा या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन इमारतीमध्ये बैठक व्यवस्थेचे सुधारीत आराखडे तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे आधीच्या अंदाजपत्राकामध्ये बदल होऊन त्यामध्ये रुपये १७,१५,५८,७७०/- इतक्या रकमेची वाढ झाली आहे. यासंदर्भात वाचा क्रमांक २ येथील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांच्या दिनांक ६ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मंजूर केलेल्या इमारतीच्या बैठक व्यवस्थेच्या आराखड्यानुसार फर्निचरसाठी रुपये २७,१७,३४,०२०/- इतक्या खर्चाचे सुधारीत सविस्तर अंदाजपत्रक आयोगास सादर केले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सीबीडी बेलापूर येथील नवीन इमारतीच्या बांधकामामध्ये फर्निचरच्या कामासाठी होणाऱ्या रुपये २७,१७,३४,०२०/- (अक्षरी रुपये सत्ताविस कोटी सतरा लक्ष चौतीस हजार वीस फक्त) इतक्या खर्चाच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कामकाजाची पद्धत, गोपनियता, त्यांची आवश्यकता तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्यता दिलेल्या अंदाजपत्राच्या आधारे आयोगाच्या कार्यालयातील फर्निचरच्या कामासाठी करण्यात आलेल्या रुपये १०,०१,७५,२५०/- (अक्षरी रुपये दहा कोटी एक लक्ष पंचाहत्तर हजार दोनशे पन्नास फक्त) इतक्या रकमेची मूळ प्रशासकीय मान्यता सुधारीत करण्यात येत असुन

या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या इमारतीमधील फर्निचरसाठी रुपये २७,१७,३४,०२०/- (अक्षरी रुपये सत्ताविस कोटी सतरा लक्ष चौतीस हजार वीस फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास खालीलप्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| Providing and Supplying Furniture to New Administrative building For Maharashtra Public Service Commission on Plot No. 1A, Sector-10, CBD Belapur, Thane Tal./Dist. Thane. | | |
|---|---|---|
| Sr. No. | Particular of Work | Cost in Rupees |
| A | Main Work | |
| | Sub Work 1 | 22,07,91,174.66 |
| | **Sub Total (A)** | **22,07,91,174.66** |
| B | Testing & Royalties | |
| | Construction Material Testing | 1,60,875.00 |
| | **Sub Total (B)** | **1,60,875.00** |
| C | Provision | |
| | Labor Insurance (1% A) | 22,07,911.75 |
| | GST (18% A) | 3,97,42,411.44 |
| | Contingencies (4% A) | 88,31,646.98 |
| | **Sub Total (C)** | **5,07,81,970.17** |
| **Total Cost of Project (A+B+C)** | | **27,17,34,020.00** |

०२. सदर कामाची सुरुवात सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे.

०३. उपरोक्त कामासाठीचा होणारा खर्च हा मागणी क्रमांक ए-९, सामान्य प्रशासन विभाग, ४०७० इतर प्रशासकीय सेवांवरील भांडवली खर्च, ०० ५१ बांधकाम, (००) (०१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम (योजना), ५३- मोठी बांधकामे, (४०७० ०३११) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

०४. हा शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/ प्र.क्र. ३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग पाच, अनुक्रमांक ९, परिच्छेद १३४ यानुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने वित्तीय प्राधिकारामध्ये नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०४०११२४३३१४२०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SMITA PRASAD JOSHI

Digitally signed by SMITA PRASAD JOSHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=d759e39e5163375d3782e5f6bef7edf6a25c72797123cdaa86acd09edf52baf1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=28AA5752FA66D3A7FDEAFB1F4AB24CD90FD9D667A6880CB8CCECA18276150ACA, cn=SMITA PRASAD JOSHI
Date: 2026.04.01 12:44:45 +05'30'

**(स्मिता जोशी)**

**अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

६) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
७) उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई,
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१०) कार्यासन (व्यय-४, अर्थ-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) कार्यासन-इमारती-१, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) निवडनस्ती, कार्यासन-मलोआ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.